# जाहिर प्रकटन

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सांगली सरळ सेवा भरती २०२३ अंतर्गत आरोग्य पर्यवेक्षक, औषध निर्माण अधिकारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, आरोग्य सेवक (महिला), आरोग्य सेवक (पुरुष ४०%) व आरोग्य सेवक (पुरुष हंगामी फवराणीधारक ५०%) या संवर्गातील रिक्त पदे भरती कामी जहिरात देणेत आलेली होती. IBPS कंपनीकडून विविध संवर्गातील रिक्त पदे भरती कामी परिक्षा घेणेत आली होती.त्यास अनुसरुन IBPS कंपनीकडुन विविध संवर्ग निहाय निकाल प्राप्त झाला.सामान्य प्रशासन विभागाकडुन वरील विविध संवर्ग निहाय निवड व प्रतिक्षा सूची आरोग्य विभागास प्राप्त झाली त्यानुसार निवड व प्रतिक्षा सूचीतील पात्र उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी करणेत आली .आरोग्य विभागाने पात्र उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी योग्य पध्दतीने केली.त्यांना रिक्त पदानुसार पदस्थापनेसह नियुक्ती आदेश दिलेले आहेत.

आरोग्य विभागाने विषयांकित पदस्थापनेसह नियुक्ती आदेश हे संबंधित उमेदवारांना/तालुका आरोग्य अधिकारी/वैद्यकिय अधिकारी यांना प्रत्यक्ष अथवा ईमेल द्वारे देणेत आलेले आहेत.सर्वच पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेत आलेले आहेत.एक ही पात्र उमेदवार नियुक्ती आदेश वाटपा पासून वंचित नाही.

तथापि सध्या जिल्हा परिषद प्रशासनास असे निर्देशनास आले आहे की, समाजातील काही अज्ञात व्यक्ती द्वारे आरोग्य विभागाकडील या पुर्वी देणेत आलेल्या संवर्ग निहाय नियुक्ती आदेशामध्ये दुरुस्ती (छेडछाड) करुन उमेदवारांना सुधारित नियुक्ती आदेश देवून नागरिकांची फसवणूक केली जात आहे. या जाहिर प्रकटन द्वारे तमाम नागरिकांना कळविणेत येते की, आरोग्य विभागाकडील सरळसेवा भरती सन-२०२३ अंतर्गत विविध संवर्गातील रिक्त पदे भरती करणेचे नियुक्ती आदेश दिलेले आहेत. आरोग्य विभागाकडून कोणताही संवर्गातील नियुक्ती आदेश देणे प्रलंबित नाही.

तरी नागरिकांनी भूलथापांना बळी पडू नये. नोकर भरतीकामी नियुक्ती आदेश देतो, नोकरी लावतो, अशी आश्वासने देणारा व्यक्ती निर्दशनास आणलेस जिल्हा परिषद प्रशासनाशी तात्काळ संपर्क साधावा हि विनंती.

(डॉ.विजयकुमार वाघ)
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली

प्रत,
मा. संपादक,
दैनिक-------